कार्य सुलतानापेक्षा मवाळ होते. धार्मिकदृष्ट्या बाबर कट्टर असला तरी राज्य विकासात बाबराने धर्म आणला नाही. बाबराने धर्मभेद न करता राज्यकारभार केला.

बाबर एक श्रेष्ठ सैनिक-सेनापती होता. घोडेस्वारी, तलवारबाजी, गणिमी पध्दत, तुलुघुमा पध्दत, तोफखाना, उत्तम वाक्पटू, पट्टीचा पोहणारा हे गुण बाबराकडे होते. सैन्यात राहून सेनापती बनलेला व सेनापती असतांना सैन्याच्या गरजांना आणि भावनांना न विसरणारा बाबर बादशाह होता. बाबराने राज्यकर्ता या नात्याने मुत्सद्दीपणाने कार्य केले. व्यक्तिची पारख बाबराकडे होती. बाबराने वायव्य भागात सैनिकी चौकी स्थापन केल्या. काबूल ते आग्रा मार्गावरील दळणवळण योग्य पध्दतीने होण्यासाठी रस्त्यांची दुरुस्ती केली.

बाबराने ५ वर्षात साम्राज्य स्थापना आणि विस्तार केला. बाबर श्रेष्ठ शासक, उत्तम सेनापती, कुशल प्रशासक, आदर्श व्यक्ति, साहित्यीक आणि कलावंत होता.

## IV) नासिरुद्दीन मुहम्मद हुमायून

### (इ.स. १५३०-४० व १५५५-५६)

बाबराला हुमायून , कामरान, अस्करी, हिंदाल आणि गुलबदन हे अपत्य होती. त्यापैकी हुमायून हा जेष्ठ होता. हुमायून शब्दाचा अर्थ **'भाग्यवान'** असा होतो. हुमायूनचा जन्म ६ मार्च १५०८ ला काबूलला झाला. हुमायूनची माता माहमबेगम होती. हुमायून गणित, तत्वज्ञान, खगोलशास्त्र, ज्योतिष ह्या विषयात पारंगत होता व तुर्की, अरबी, हिंदी, पार्शियन भाषा हुमायूनला अवगत होत्या.

**१. हुमायूनचे प्रारंभीक कार्य :** हुमायूनला बाबराने सैनिकी शिक्षणही दिले. बाबर फरगाणा आणि समरकंदचा शासक होता. बाबराने इ.स.१५०४ ला काबूल जिंकले. बाबर काबूलचा बादशाह असतांना हुमायूनचा जन्म झाला त्यामुळे हुमायूनच्या बालपणाचा काळ काबूलमध्ये गेला. बाबर १५२५ नोव्हेंबरला पानिपत स्वारीवर भारतात आला त्यावेळी बाबराने एका तुकडीचे नेतृत्व हुमायूनला दिलेले होते. पानिपत युध्दाअगोदर हुमायूनने पंजाबचा सुभेदार हमीदखानाचा पराभव हिस्सार येथे केला होता. पानिपत युध्दात, युध्दानंतर आग्रा-ग्वाल्हेर जिंकण्यात व राणासांगाविरूध्द खानवा युध्दात हुमायूनने भाग घेतला. इ.स.१५२७-२९ काळात हुमायून बदक्शानचा राज्यपाल होता. इ.स.१५२९ ला संभंळची जहागिरी हुमायूनला मिळाली. हुमायून दुबळ्या यष्टीचा असल्याने संभळला आजारी पडला. बाबराच्या मृत्युनंतर ४ दिवसाने ३० डिसेंबर १५३० ला हुमायून बादशाह बनला.

**२. हुमायूनच्या समोरील समस्या :** हुमायून आग्रा येथे बादशाह बनला. त्यावेळी राज्य अस्थिर होते. मोगल परकीय या भावनेने प्रजेचा विरोध चालू केला होता. हुमायूनला अस्करी-हिंदाल व कामराने हे तीन सावत्र भाऊ होते. त्यांनी अविचारी भूमिकेतून विरोध

III) **चंदेरीचे युध्द :** बाबराने खानवा विजय मिळवला. बाबराने खानवा विजयानंतर शेजारचे प्रदेश जिंकले. पराभव झालेल्या राजपूतांनी राजपूतान्याऐवजी माळव्यात मेदिनीरायाकडे आश्रय घेतला. माळव्याच्या राजाचा सेनापती पंतप्रधान मंदिनीराय होता. मंदिनीरायने राजपूत सैन्य एकत्र केले व ५,००० सैन्य चंदेरी येथे गोळा केले. बाबराने चंदेरीच्या किल्ल्याला वेढा दिला. २९ जानेवारी १५२८ ला चंदेरीचा किल्ला बाबराने जिंकला. राजपूत सैन्याने आणि स्त्रियांनी जोहार केले. खानवा युध्दामुळे राजपूतांची ताकद नष्ट झाली. बाबराने चंदेरी विजयानंतर मिळालेली संपत्ती सैन्याला वाटली व नोव्हें. १५२५ ला भारतात आलेल्या काबूलच्या सैन्याला परत जाण्याची परवानगी दिली. पण स्वत: बाबर दिल्लीत स्थाईक झाला.

IV) **घागरा युध्द :** बाबराने चंदेरी जिंकल्यानंतर बंगाल-बिहार मधील समस्येकडे लक्ष दिले. बंगाल-बिहारमध्ये अफगाणांची सत्ता होती. बाबराने अफगाण सरदारांच्या हालचाली लक्षात घेतल्या. बंगालचा नवाब **नुसरतशाह** अफगाण होता. खानवा युध्दात राणासांगाला साह्य करणारा इब्राहीम लोदीचा भाऊ महमुद लोदीने खानावा युध्दातून पळ काढून नुसरतशाहकडे आश्रय घेतला. पानिपत युध्दात बाबराच्या सैन्यात असणारा शेरशाह सूरी अफगाण सरदारांचा पक्षधर होता. बाबराने बंगालमध्ये अफगान सरदार एकत्र येत असल्याने बंगालवर स्वारी केली. महमूद लोदीने किल्ल्याचा आश्रय घेतला. नुसरत शाहने युध्दाची तयारी केली. घागरा आणि गंगा नदीच्या संगमावर बक्सारजवळ **घागरा** येथे ६ मे १५२९ ला युध्द झाले. नुसरशाहने अफगाणांना आश्रय न देण्याचा करार केला. उत्तर बिहार जिंकून बाबराने दिल्लीत आश्रय घेतला.

**७. बाबराचा मृत्यू :** बाबराने राजपुत्र हुमायुनला संबळचा राज्यपाल बनवले. हुमायून संबंळ येथे आजारी पडला. बाबराने हुमायूनची काळजी घेण्याची व्यवस्था केली. आग्रा येथे हुमायूनला आणण्यात आले. हुमायून आजारपणातून दुरुस्त होत असतांना बाबराचा आजाराने २६ डिसेंबर १५३० ला मृत्यू झाला.

**मूल्यमापन :** बाबर हा समरकंद परगाण्याचा शासक होता. जय आणि पराजय होत असतांना बाबराने लष्करी गुणाने विजय मिळवले. महत्वकांक्षा बाळगली व साम्राज्य स्थापन केले. बाबराला तीन पत्नी- माहम- गुलरुस आणि दिलवर तर ५ आपत्य- हुमायून, हिंदाल, अस्करी, कामरान आणि गुलबदल हे होते. बाबर आदर्श पिता, पुत्र व पती होता. बाबर उत्तम सेनापती होता तसा उत्तम फारसी भाषेचा जाणकार होता. बाबराने **'तुझूके-ए-बाबरी'** हे आत्मचरित्र लिहले. **'दिवाण'** हा काव्यसंग्रह आणि **मुबाईया** हा नवीन काव्यप्रकार अस्तित्वात आणला. गान आणि संगिताचा बाबर चाहता होता. धार्मिकदृष्ट्या बाबराचे

लोदीचे सैन्य बाजारबुणगे होते. प्रत्यक्ष सैन्य संख्या अर्धीच होती. बाबराने मध्य आशियातील घोडदळ, तोफखाना, बंदूक, तुलुघुमा पध्दत, गनिमी कावा पध्दत वापरली होती. या कारणामुळे बाबराला पानिपतच्या युध्दात विजय मिळाले.

**६. मोगल सत्तेची स्थापना :** २१ एप्रिल १५२६ ला पानिपत युध्द जिंकल्यानंतर बाबराने दिल्ली, ग्वाल्हेर, आग्रा इ. शहरे व किल्ले जिंकण्यासाठी हुमायुनला पाठविले. अफगाण लोदी सरदारांचा पराभव बाबराने केल्यानंतर २७ एप्रिल १५२५ ला बाबराने दिल्लीत मोगल सत्तेची स्थापना केल्याचे व बादशाह झाल्याचे घोषीत केले. बाबराने काबूल सोडून ६ महिने झाल्याने सैन्य युध्दाला कंटाळले होते. सैन्य वापस जावू इच्छित होते पण बाबराने सैन्याला जाण्याची परवानगी दिली नाही.

**II) खानवा युध्द :**

बाबर आणि मेवाडचा राणासांगा यांच्यात खानवाचे युध्द १६ मार्च १५२७ ला झाले. युध्दाचे कारण बाबराने पानिपत विजयानंतर, आतापर्यंतच्या मोगल आक्रमकांप्रमाणे परत न जाता बादशाह म्हणून दिल्लीत घोषीत केल्याने दिल्ली जिंकण्याचे राजपूतांचे स्वप्न नष्ठ झाले. त्यामुळे राणासांगाने बाबरावर आक्रमण केले. राणासांगा याने राजपुत संघ बनवला. ७ मांडलिक + १०४ प्रमुख सरदार + ८०,००० सैन्य + हत्तीदळ उभा केले व बयाना, काल्पी व धोलपूरवर स्वारी केली व दिल्लीच्या सुभेदारांचा पराभव केला. पराभव झालेले सरदार आग्रा येथे बाबराला जावून मिळाले. अफगाण सरदार, लोदीचा भाऊ व त्याचा पुत्र सिकंदर लोदी हे ही राणासांगाला जावून मिळाले.

राणासांगाच्या युध्द तयारीमुळे, राणासांगाच्या पराक्रमाच्या गौरवगाथा ऐकल्यामुळे व बयानावरील राणासांगाच्या विजयामुळे बाबराचे सैन्य गलितगात्र झाले. आशावेळी उत्तम वक्ता असणाऱ्या बाबराने सैन्याला उपदेश केला. - **'जो जन्मला त्याला मृत्युही अटळ आहे. युध्दात मृत्यू आला तर शहीद होवूत अथवा काफीरांना मारुन गाझी होवूत'** यामुळे सैन्य लढण्यासाठी तयार झाले. खानवा युध्दातही तुलुघुमा युध्द पध्दतीच वापरली. १६ मार्च १५२७ ला युध्द झाले. युध्दात राणासांगा जखमी झाला. बाबराला विजय मिळाला.

**१. खानवा युध्दाचे परिणाम :** मोगल सत्तेच्या स्थापनेला खानवा विजयाने दृढता आली. राणासांगाच्या पराभवामुळे दिल्लीचे शासक होण्याची राजपूतांची इच्छा धुळीला मिळाली. भारतात बाबराने सत्ता स्थापन केल्याने मोगल साम्राज्याची राजधानी दिल्ली बनली. खानवा युध्दात राजपूतांच्या सामर्थ्याची जाणीव बाबराला झाल्याने बाबराने राजपूताना घेरण्याचा प्रयत्न पुढे केला नाही. खानवा युध्दामुळे राजपुतांपासून असणारा दिल्लीला धोका नष्ट झाला. दिल्ली सुरक्षीत बनली.

कैद केले पण तो कैदेत मृत्यू पावला. अलमखाँला दिल्लीचा सुलतान घोषीत करून स्वत:बरोबर ठेवले.

B. **युध्द :** बाबराने २५,००० सैन्य भरती केली. बाबर भारतात चालून येत आहे हे कळताच इब्राहीम लोदीने युध्द तयारी केली. बाबराचा मुलगा हुमायून दुसऱ्यामार्गे दिल्लीकडे येत असतांना दिल्लीच्या सैन्याचा पराभव हुमायुनने केला. बाबर आणि हुमायूनचे सैन्य एकत्रितरित्या **पानिपत** येथे जमले. पानिपत येथेच बाबर व इब्राहीम लोदी यांच्यात युध्द झाले.

C. **तुलुघुमा युध्द पध्दती :** दिल्लीच्या उत्तरेला सोनपत जवळ **पानिपत** येथे २१ एप्रिल १५२६ ला युध्द झाले. युध्दासाठी बाबराकडे २५,००० तर लोदीकडे १ लाख सैन्य होते. दिल्लीच्या उत्तरेला पानिपत रणांगणावर लोदीच्या सैन्याशी प्रतिकार करण्यासाठी तुलुघुमा या उझबेगीच्या सरदारांच्या शैलीचा वापर बाबराने केला.


रणांगणावर शेजारील खेड्यातील बैलगाड्या एकास-एक चाकांना बांधून सरळ रेषेत लावण्यात आल्या. ठराविक अंतरावर मध्ये रस्ता ठेवण्यात आला. बैलगाडीच्या दोन्ही बाजूला सैन्य तुकड्या आणि एका बाजूस तोफखाना तर दुसऱ्या बाजूस बंदूकधारी सैन्य ठेवले. बैलगाडीच्या मागील बाजूस सैन्य फळी व त्यामागे बाबर स्वत: उंच भागावर सुरक्षीत फौजेसह उभा राहिला. तर इब्राहीम लोदीची फौज सरळ रेषेत होती. २१ एप्रिलला युध्द झाले. बाबराच्या तोफ आणि बंदूक माऱ्यापुढे इब्राहिम लोदीचे सैन्य टिकू शकले नाही. १५,००० सैन्य रणांगणावर सुलमानासह मारले गेले.

D. **पानिपत युध्दाचे परिणाम :** पानिपतच्या पहिल्या युध्दात बाबराला विजय मिळाला. बाबर दिल्लीचा बादशाह बनला. सुलतान लोदीच्या मृत्यूने ३२० वर्षाची सुलतानशाही नष्ठ झाली. मोगलशाहीची स्थापना झाली. राजपूतांनी विशेषत: मेवाडच्या राणासांगांनी युध्दावेळी तटस्थता स्वीकारली पण बाबर परत काबूलला न गेल्याने राणासांगाची दिल्ली जिंकण्याची इच्छा फलद्रुप होवू शकली नाही, भारतात सतत होणारी वायव्य भागातील आक्रमणे कायम थांबली, नवीन युगाचा प्रारंभ झाला, युध्दात १५,००० सैन्य मारले गेले. काबूलचा बादशाह बाबर दिल्लीचा बादशाह बनला. मोगल साम्राज्याची स्थापना झाली.

E. **बाबराच्या विजयाची कारणे :** बाबराने पानिपतमध्ये युध्दासाठी **तुलुघुमा** ही युध्द कला वापरली. भारतीयांच्या दृष्टीने ही कला नवीन होती. इब्राहीम लोदीचे सैन्य रणांगणावर घेरले गेले शिवाय बाबराने युध्दात सुरक्षीत फौजेचा वापर केला. याचबरोबर बाबराला विजय मिळवून देण्यासाठी लोदी विरूध्द नाराज असणारे सरदार बाबराला मिळाले, लोदीची असणारी अप्रिय सत्ता, लोदीच्या तुलनेत बाबराकडे श्रेष्ठ सेनापतीचे गुण होते. इब्राहीम

I) पानिपत युध्द-I- इ.स. १५२६ :

**A. कारणे :** बाबराने भारतावर पाचवी स्वारी नोव्हे. १५२५ ला केली. बाबर काबूलहून निघाला. पाचव्या स्वारीची कारणे- भारतातील राजकीय परिस्थिती, बाबराच्या पूर्वीच्या स्वाऱ्यात मिळालेले विजय, दिल्लीची लोदी सत्ता, पंजाबमधील संघर्ष, दौलतखांचे निमंत्रण इ. होते. बाबर केवळ १२,००० सैन्यासह निघाला. बाबराच्या सैन्याची संख्या कमी होती. बाबराकडे तोफखाना आणि घोडेस्वार होते तरी बाबराने पंजाब जिंकला. दौलतखानाला



यावेळी बाबर २१ वर्षाचा होता. बाबराने काबूल, कंधार व हेरात जिंकले. इ.स. १५११ ला समरकंद तिसऱ्यावेळी जिंकले. बाबराच्या पित्याचे राज्य समरकंद-फरगाणा बाबराला मिळाले पण इ.स. १५१४ ला पुन्हा गमावले त्यामुळे बाबर नाराज झाला व गमावलेल्या साम्राज्याच्या पश्चिमेला बाबराने मोहिमा काढल्या. इ.स. १५१९ पासून बाबराने पूर्वेकडे मोहीम काढण्याऐवजी पश्चिमेकडे काढल्या. इ.स. १५०४ ते १५२५ पर्यंत बाबर काबुलचा बादशाह होता.

बाबर मध्य आशियातील जय-पराजयात घडला. आप्त स्वकीयांचा त्रास बाबराने सहन केला पण त्यात त्याने आक्रमक वंशाच्या चाली शिकला, उझबेगी लोकांची **तुलुघुमा पध्दत** त्याने अवगत केली, तुर्क पर्शियनांचा तोफखाना, अफगान लोकांची गणिमी पध्दत त्याने शिकली. या सर्व गुणांचे मिश्रण बाबराने भारतातील विजयामध्ये वापरले.

**५. बाबराच्या भारतावरील स्वाऱ्या :** बाबराने भारतावर इ.स. १५१९-२५ काळात ५ स्वाऱ्या केल्या. भारतावर स्वाऱ्या करण्याचे कारण पूर्वजांनी मिळवलेली संपत्ती, आप्त स्वकियांकडून झालेला त्रास, तैमूरने जिंकलेला पंजाब परत मिळवणे, भारताबद्दलचे आकर्षण हे होती. बाबराने पहिली स्वारी इ.स. १५१९ ला युसुफजाई टोळ्यांच्या बंदोबस्तासाठी केली. पंजाबचा राज्यपाल दौलतखान लोदीच्या प्रतिकारामुळे बाबर भेरा येथून काबुलला परत गेला. इ.स. १५१९ ला दुसरी स्वारी खैबरखिंडीतून केली. बाबर पंजाबमध्ये पोहचत असतांना बदक्शानमध्ये बंड झाल्याने बाबर परत गेला. तिसरी स्वारी इ.स. १५२० ला केली पण कंधारमध्ये बंड झाल्याने बाबर भारतातून परत गेला.

बाबराने चौथी स्वारी पंजाबवर दौलतखानाच्या निमंत्रणावरुन केली. इब्राहीम लोदीच्या विरोधात बाबरास दौलतखानाने निमंत्रीत केले. इब्राहिम लोदीने बाबर भारतात येण्यापूर्वीच दौलतखानाचा पराभव केला. तोपर्यंत बाबर लाहोरला पोहचला. त्यामुळे दौलतखान बाबरास जावून मिळाला. पंजाब किल्ला त्यावेळी दौलतखानाचा पुत्र दिलावरखान याने बाबराकडे पित्याची तक्रार केल्याने बाबराने दौलतखानाला व दिलावरखानाला पंजाबच्या अर्ध्या-अर्ध्या भागावर सुभेदार नेमले. इब्राहीम लोदीचा काका आलमखानही बाबराला येवून मिळाला. बाबराने पंजाबची वाटणी दिलावर व दौलतखानात केली. दिल्लीचा वारस म्हणून आलमखाला नियुक्त केले व बाबर काबूलला परत गेला.

बाबर काबूलला पोहचताच दौलतखानने दिलावरखाँनाचा पराभव केला. आलमखाला आपल्या पक्षात घेतले हे बाबराला कळताच बाबराने भारतावर पाचवी स्वारी इ.स. १५२५ ला केली.

# III) मोगल साम्राज्य संस्थापक बाबर

प्रास्ताविक : भारतात मोगल साम्राज्याची स्थापना जहिरुद्दीन मुहम्मद बाबराने केली. ३२० वर्षाच्या सुलतानशाहीच्या जागी मोगल साम्राज्याची स्थापना केली. मोगल सत्तेची स्थापना करणारा बाबर साहसी, महत्वकांक्षी व प्रतिकूल परिस्थितीत राज्य संस्थापना करणारा होता. इ.स. १५२६-३० केवळ ५ वर्षे बाबराने राज्य केले पण अल्पकाळ राजसत्ता उपभोगणारा बाबर-मोगल वंशाची सत्ता भारतात ३३१ वर्षे होती. बाबराने भारतात ५ वर्षे राज्य केले. ५ वर्षात मोठे ४ युध्द लढले आणि मोगल साम्राज्याचा पाया घातला.

**१. पूर्व चरित्र :** बाबर तैमूरलंगाच्या वंशातील पैतृत्वाने ५ व्या पिढीतील तर मातृत्व वंशाने चंगे झखानाच्या १४ व्या पिढीतील होता. बाबराचे पिता **उमर शेख मिर्झा** आणि माता **कुतलक निगार** यांच्या पोटी १५ फेब्रुवारी १४८३ ला बाबराचा जन्म मध्य आशियात फरगाणा प्रांताची राजधानी **आंदिजान** येथे झाला. बाबराच्या पित्याला चंगेझखानाच्या मुलाच्या काळात चगताको नांवाच्या (औक्सस) नदीच्या काठावर प्रांत मिळाला होता त्यामुळे बाबराचा वंश **चगताई** नावे ओळखतात पण बाबराच्या वंशास मात्र मातेच्या वंशाचे नाव **'मोगल'** मिळाले.

**२. शिक्षण :** बाबर पिता उमरशेख मिर्झा याने बाबराच्या शिक्षणाची व्यवस्था उत्तम केली होती. बाबराचे गुरु **शेख मजीद** हे होते. बाबराला शिक्षणाचे आणि आचार-विचाराचे शिक्षण कुतलनिगारच्या मातेने आयेशा दौलतने दिले. बाबराला वयाच्या ९ व्या वर्षी सत्ता स्वीकारावी लागली. बाबराचे पूर्ण नांव **जहिरुद्दीन मुहम्मद बाबर** होते.

**३. फरगाणा शासक - बाबर :** इ.स. १४९४ ला उमर शेख मिर्जाचा इमारतीवरुन पडून मृत्यू झाला. मध्य आशियात बदक्षाण, काबूल, कंधार, हेरात, समरकंद, फरगाणा व खोरासन हे राज्य होती. मंगोल आणि तैमूरच्या वारसदारांकडे ह्या प्रांताचा ताबा होता. उमरशेख मिर्झा फरगाणाचा शासक होता. इ.स. १४९४ ला बाबर फरगाणाचा शासक झाला.

बाबराने वयाच्या १४ व्या वर्षी फरगाणाहून समरकंद जिंकण्यासाठी आक्रमण केले व समरकंद जिंकले पण बाबर आजारी पडला त्यामुळे समरकंद आणि फरगणा बाबराला गमवावे लागले. बाबराने १७ व्या वर्षी पुन्हा फरगणा-समरकंद जिंकले पण इ.स. १५०२ ला पुन्हा गमविले. तेंव्हा बाबराने आप्तस्वकियांच्या त्रासापासून वाचण्यासाठी काबूलकडे प्रयाण केले.

**४. काबूलचा विजय :** बाबराला समरकंद आणि फरगाणा गमविल्यानंतर बाबर दक्षिणेकडे काबूल विजयासाठी प्रयत्नशील राहिला. इ.स. १५०४ ला काबूल जिंकले.